# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १८/०६/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत १० कि.मी अंतरावर मौजा कोतवालबर्डी येथे दरम्यान फिर्यादी नामे— संदीप आनंदराव पडोळे वय ३२ वर्ष, रा. कोतवालबर्डी हे आपले मित्र किरायदार निखील चंद्रशेखर इरखडे व त्यांचे वडील चंद्रशेखर इरखेडे, अमित भिंगारे असे घरी गोष्टी करीत असतांना आरोपी नामे— नविन पंजाबराव गोडबोले, वय ४१ वर्ष, रा. कोतवालबर्डी हा त्याचे घरी आला व फिर्यादीने आरोपीस दि १३/०६२२०२२ रोजी माझा मोबाइल चोरून नेला असे म्हणत असता फिर्यादी व आरोपी यांचेत बाचाबाची व शिवीगाळ झाली. दिनांक १६/०६/२०२२ चे २१.०० वा. सुमारास आरोपीने खिशातुन सुरी काढून थांब तुला जिवाने खतम करतो असे म्हणुन फिर्यादीच्या छातीवर व गळयावर सुरी मारत असता फिर्यादीने वार चुकविला व तो फिर्यादीचे छातीच्या डाव्या बाजुला लागला. आरोपीने फिर्यादीस छातीच्या डाव्या बाजुला सुरीने मारत जिवानिशी ठार करण्याचा प्रयत्न केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ३२३, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोनि असिफराजा शेख मो.नं. ८४०८८०६६९० हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंर्तगत गुमथाळा मौदा येथे दिनांक १५/०६/२२ चे १७/०६/२२ चे १०:०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रसाद वासुदेव जोशी, वय ३६ वर्ष, रा. कढोली हे महावितरण विभाग मौदा गुमथाळा उपकेंद्र येथे वरीष्ठ पदावर कार्यरत असुन फिर्यादी व त्यांचे सहकारी यांनी गुमथाळा वितरण केंद्र A-B SWITCH चे दोन सेट आणुन मधुकर वनकर यांच्या बंगल्यावर आणुन ठेवले असता व त्या ठिकाणी काम केले व सायकाळी ८:०० वा. फिर्यादी व त्यांचे सहकारी कामावरून निघुन गेले. दिनांक १६/०६/२२ रोजी सकाळी १०:०० वा. फिर्यादी व सहकारी मधुकर वनकर यांच्या बंगल्यावर पोहचले असता बंगल्याची दरवाज्याची चिटकणी तुटलेली दिसली. त्यांनी आत मध्ये जावून पाहीले असता सामान अस्त व्यस्त झालेला दिसुन आले व ठेवलेले दोन A-B SWITCH चे दोन सेट चोरीला गेलेले आढळले. तसेच टुल बॅग व तांब्याची फयुज तार चोरीला गेलेली दिसुन आली. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने A-B SWITCH चे दोन सेट ची किमत २५,९६०/—रू. टुल बॅग किमत १५००/—रू. प्युज वायर किमत ५००/—रू. असे एकुण कि. २७,९६०/— रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री मोहोड मो.नं. ९८२३९१०१५६ हे करीत आहे.

# मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. मौदा** :– अंर्तगत आजनगाव ते मांगली येथे दिनांक १७/०६/२०२२ चे ०८.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– मंगेश हरपाल इखार वय २८ वर्ष, रा. साई नगर हिंगना रोड नागपुर यांनी आपली एम एच– ४०/बीयु– ७८४३ क्रमांकाची मोटरसायकल ही आजनगाव ते मांगली या रोडच्या साईडने ठेवून शेतातील फार्म हाउस ची पाहनी करायला गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. ३०,०००/–रु. ची मोटरसायकल चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा यंगलवार मो.क्र. ९४२३२१९४२९ हे सुरू आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**